# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.02.2026** **वारःसोमवार**

---

1. नागरिकांच्या कल्याणावर केंद्रित 2026-27 वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर.
2. अर्थसंकल्पातून विकसित भारताच्या संकल्पाला बळकटी -पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
3. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून ओडिशा आणि छत्तीसगडच्या दौऱ्यावर
4. बिहार तसंच जम्मू आणि काश्मीर विधानसभेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून आणि
5. ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेचं जेतेपद पटकावत कार्लोस अल्काराझची ऐतिहासिक कामगिरी

**अर्थसंकल्प**

2026-27 या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल संसदेत सादर केला. आर्थिक वृद्धीदर वाढवणं, नागरिकांचं कौशल्य विकसित करणं आणि नागरिकांना सोयीसुविधा, सवलतींचा पुरेपूर लाभ देणं या तीन कर्तव्यांवर आधारित तसंच युवा शक्तीला केंद्रस्थानी ठेवून अर्थसंकल्प सादर करण्यात आल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. साडेत्रेपन्न लाख कोटींचा हा अर्थसंकल्प असून या वर्षात सरकारला साडे छत्तीस लाख कोटी रुपये एकंदर महसूल मिळेल. 2026-27 च्या अर्थसंकल्पांतील विविध तरतुदींविषयी अधिक माहिती ऐकूया माझ्या सहकारी संध्या खान यांच्याकडून.....

**यंदाच्या अर्थसंकल्पात शहरी आर्थिक क्षेत्रांचा विकास करण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यासाठी प्रत्येक क्षेत्राला 5 वर्षात 5 हजार कोटी रुपयांचा निधी दिला जाणार आहे. याशिवाय दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतली शहरं, तसंच तीर्थस्थळांवर लक्ष केंद्रीत करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्यामदतीसाठी दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांमध्ये कॉर्पोरेट मित्र ही व्यवस्था उभारण्यात येणार आहे.**

**महिला बचत गटांसाठी 'शी मार्ट्स' सुरू करण्याची घोषणा, तसंच खादी, हातमाग आणि हस्तकला क्षेत्राला बळकटी देण्यासाठी, त्यांना जागतिक बाजारपेठेशी जोडण्यासाठी आणि ब्रँडिंगसाठी महात्मा गांधी ग्राम स्वराज उपक्रम राबवण्याचा प्रस्तावही यंदाच्या अर्थसंकल्पात आहे.**

**देशभरात दळणवळण सुविधा भक्कम करण्याच्या उद्देशानं विविध महानगरं जोडणाऱ्या रेल्वेच्या 7 हायस्पीड कॉरिडॉर्सची घोषणा काल केंद्रीय अर्थमंत्र्यांनी केली. यामध्ये मुंबई–पुणे आणि पुणे -हैद्राबाद या मार्गाचा समावेश आहे.**

**देशातल्या महत्त्वाच्या औद्योगिक कॉरिडॉर्सच्या जवळ 5 शैक्षणिक परिसर विकसित करायची घोषणाही करण्यात आली. विविध विद्यापीठं, महाविद्यालयं, संशोधन संस्था, कौशल्य केंद्रांची संकुलं इथं सुरू होतील. विज्ञान, तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स आणि गणित या क्षेत्रांमध्ये विद्यार्थिनींचा सहभाग वाढवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात त्यांच्यासाठी वसतीगृह सुरू केली जाणार आहेत.**

या अर्थसंकल्पांत सेवा क्षेत्रावर विशेष भर दिला असून शिक्षणातून रोजगार आणि स्वयं-उद्योजकतेला चालना देण्यासाठी उच्चस्तरीय स्थायी समिती स्थापन करण्याची घोषणा सीतारामन यांनी केली आहे. ही समिती कौशल्याधारित रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रित करेल.

मुंबईतल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीजच्या माध्यमातून 15 हजार माध्यमिक शाळा आणि 500 महाविद्यालयांमध्ये एव्हीजीसी कंटेंट क्रिएटर लॅब्स सुरू केल्या जाणार आहेत.

ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य सुविधा पुरवणाऱ्यांना योग, तसंच वैद्यकीय उपकरणं वापरण्याचं प्रशिक्षण देऊन येत्या काळात अशा दीड लाख काळजीवाहकांना प्रशिक्षित करायचं ध्येय अर्थमंत्र्यांनी आज जाहीर केलं.

आयुर्वेदाला चालना देण्यासाठी 3 नव्या अखिल भारतीय आयुर्वेद संस्थांची स्थापना केली जाणार आहे. पशुवैद्यकीय क्षेत्रातही अतिरिक्त महाविद्यालयं सुरू केली जाणार आहेत.

पुढच्या पाच वर्षांत बायोफार्मा शक्ती कार्यक्रमासाठी दहा हजार कोटी रुपयांची तरतूद आणि पाच प्रादेशिक वैद्यकीय केंद्रं स्थापन करण्यासाठी राज्यांना मदत करण्यासाठी योजना सुरू करण्यात येणार आहे.

दिव्यांग नागरिकांना माहिती तंत्रज्ञान, आदरातिथ्य, खाद्यपेय क्षेत्रात संधी उपलब्ध करुन देण्यासाठी सरकारमार्फत विशेष प्रशिक्षण दिलं जाणार आहे. दिव्यांग सहारा योजना सुरू करुन या नागरिकांना कृत्रिम अवयव पुरवणं, त्यांच्यासाठी विशेष मॉल सुरू करणं यासह विविध योजना सरकार राबवणार आहे.

क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी आगामी दशकभराच्या काळात प्रशिक्षण केंद्रं आणि प्रशिक्षकांच्या पद्धतशीर विकासावर लक्ष भर असलेलं खेलो इंडिया अभियान सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. तर पर्यटन क्षेत्राच्या वृद्धीसाठी निवडक 20 पर्यटनस्थळांवर 10 हजार गाईड्स करता प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रस्तावही सीतारामन यांनी  अर्थसंकल्पात मांडला.

नारळ, चंदन, काजू, कोको यासारखं चांगलं उत्पन्न देणाऱ्या पीकांना किनारी भागात तर बदाम, अक्रोड यासारख्या पीकांना डोंगराळ भागात प्रोत्साहन देण्याचा सरकारचा मानस आहे.

येत्या नवीन आर्थिक वर्षापासून देशात नवीन प्राप्तिकर कायदा लागू होणार आहे. त्यात प्राप्तिकराचे नियम आणि परताव्याचे अर्ज सुलभ केले असून लवकरच ते उपलब्ध होतील. सहकारी संस्था, माहिती तंत्रज्ञान कंपन्या, डेटा सेंटर स्थापन करणाऱ्या कंपन्यांना प्राप्ती करात सवलत जाहीर झाली आहे. देशातल्या बँकिंग क्षेत्राचा आढावा घेण्यासाठी आणि विकसित भारताच्या दृष्टीने त्यांना सक्षम करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली.

मत्स्य निर्यात, चामडे आणि वस्त्रोद्योगाला निर्यातीसाठी विविध प्रकारच्या करसवलती अर्थमंत्र्यांनी जाहीर केल्या. अणूऊर्जा प्रकल्पांचे साहित्य, लिथियम आयन बॅटरी, सौर उपकरणांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या वस्तू, दुर्मिळ खनिजं, विमान निर्मितीसाठीचे सुटे भाग, यांच्यावरील आयातीवरच्या शुल्कातही सवलत जाहीर करण्यात आली आहे.

**व्यक्तीगत वापरासाठी आयात केलेल्या वस्तूंवर आता 20 ऐवजी 10 टक्के आयात शुल्क लागेल. कर्करोगाच्या 17 औषधांना सीमा शुल्कातून सवलत मिळाली आहे. सीमा शुल्कासंबंधीच्या विविध प्रक्रिया तसंच कार्गो हाताळणीची प्रक्रिया सुलभ करण्याची घोषणाही अर्थमंत्र्यांनी केली.**

**अर्थसंलक्प प्रतिक्रिया**

यंदाच्या अर्थसंकल्पातून 2047 च्या विकसित भारताच्या संकल्पाला आणखी बळकटी मिळाली असून भारताच्या वैश्विक भूमिकेला सशक्त करणारा हा अर्थसंकल्प असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यानी म्हटलं आहे...

**ये बजट अपार अवसरों का राजमार्ग है। ये बजट वर्तमान के सपनों को साकार करता है। और भारत के उज्ज्वल भविष्य की नींव को सशक्त करता है। ये बजेट ट्वेंटी सैंतालीस के विकसित भारत की हमारी ऊंची उड़ान का मजबूत आधार है। साथियों आज भारत जिस रिफॉर्म एक्सप्रेस पर सवार है, इस बजट से उसे नई ऊर्जा, नई गति मिलेगी।**

विविध केंद्रीय मंत्री, तसंच उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनीही या अर्थसंकल्पाचं स्वागत केलं आहे. विकसित भारताकडे दमदार पाऊल टाकणारा हा अर्थसंकल्प असूंन मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरमुळे राज्याच्या जीडीपीत मोठी वाढ होईल, असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

**राष्ट्रपती दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून ओडिशा आणि छत्तीसगडच्या सहा दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यादरम्यान, राष्ट्रपती बालासोर इथल्या फकीर मोहन विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहतील आणि तिथं नव्यानं बांधलेल्या सभागृहाचं उद्घाटन करतील. तसंच राष्ट्रपती रायंगपूरमधल्या महूलडीहा इथल्या मुलींच्या शासकीय उच्च माध्यमिक शाळेत भंजबीर सुनाराम सोरेन यांच्या पुतळ्याचं अनावरण करतील. त्यायाशिवाय भुवनेश्वर इथं ओडिशा सरकार आणि ग्लोबल फायनान्स अँड टेक्नॉलॉजी नेटवर्क यांच्या संयुक्त विद्यमानं आयोजित 'ब्लॅक स्वान समिट, इंडिया' या कार्यक्रमालाही राष्ट्रपती मुर्मू उपस्थित राहतील. तसंच 7 फेब्रुवारीला छत्तीसगडमधील जगदलपूर इथं 'बस्तर पंडुम' या महोत्सवाचं उद्घाटनही राष्ट्रपती करतील.

**बिहार अर्थसंकल्प**

बिहार विधानसभेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आज राज्यपालांच्या अभिभाषणानं सुरु होणार आहे. राज्यपालांच्या अभिभाषणानंतर लगेचच सरकारतर्फे आर्थिक पाहणी अहवाल सादर केला जाईल. तर उद्या अर्थमंत्री बिजेंद्र प्रसाद यादव सभागृहात 2026-27 या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करतील.

**जम्मू-काश्मीर-अर्थसंकल्प**

जम्मू आणि काश्मीर विधानसभेचं अर्थसंकल्पीय अधिवेशनही आजपासून सुरु होत आहे. नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या अभिभाषणानं या अधिवेशनाला सुरवात होईल. तर 6 फेब्रुवारीला मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री उमर अब्दुल्ला 2026-27 या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करतील.

**इराण-अमेरिका**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प मध्य पूर्वेत लष्करी सामर्थ्य जमवत असूंन इराणवर कोणताही हल्ला झाल्यास त्याचे रूपांतर 'प्रादेशिक युद्धात' होईल, असा इशारा इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांनी अमेरिकेला दिला आहे. ते काल मोठ्या जनसमुदायाला संबोधित करताना बोलत होते. इराणमध्ये अलीकडील सरकारविरोधी

निदर्शनांदरम्यान सरकारी कार्यालये, बँका आणि मशिदींवर हल्ले करण्यात आले जे एका सत्ता पालटासारखेच होतं असं सांगत, अमेरिका इराण आणि त्याचे प्रचंड तेल आणि नैसर्गिक वायूचे साठे गिळंकृत करू इच्छित आहे, असंही अली खामेनी म्हणाले.

**<u>भुकंप</u>**

जम्मू आणि काश्मिरमधील बारामुला जिल्ह्यात आज सकाळी 4 पुर्णांक 6 रिख्टर क्षमतेचा भुकंपाचा धक्का बसला. यामुळे कोणत्याही प्रकारची हानी झाल्याचं अद्याप वृत्त नाही.

**<u>टेनिस</u>**

कार्लोस अल्काराझनं ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत अत्यंत चुरशीच्या सामन्यात नोव्हाक जोकोविचचा पराभव करत पहिल्यांदाच जेतेपद पटकावलं आहे. या विजयामुळं सर्वांत कमी वयात चारही ग्रँड स्लॅम स्पर्धा जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी अल्काराझनं केली आहे. अल्काराझनं काल झालेल्या अंतिम लढतीत 2-6, 6-2, 6-3, 7-5 अशी दिमाखदार खेळी केली.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**